# बचत खात्यातील किमान शिल्लक

संदर्भ क्र. डीबीओडी. डीआयआर. बीसी ५३/१३.१०.००/२००२-०३

डिसेंबर २६, २००२

सर्व वाणिज्य बँका
(आरआरबीज सोडून)

प्रिय महोदय,

**बचत खात्यातील किमान शिल्लक**

बचत खात्यात ठेवावयाच्या किमान रकमेबद्दल भारतीय रिझर्व बँकेकडून कोणत्याही प्रकारची मार्गदर्शक तत्वे देण्यात आलेली नाहीत. अशा खात्यासाठी द्यावयाच्या सेवांचा आणि सांभाळण्यासाठी येणारा खर्च लक्षात घेऊन, बँका, बचत खात्यात किमान शिल्लक रक्कम नेमून देतात आणि तेवढी शिल्लक रक्कम, खात्यात न ठेवली गेल्यास विशिष्ट आकार लावतात. परंतु याबाबतीत कोणतीही एकसमान भूमिका नाही.

२. आम्हाला कळविण्यात आले आहे की, खाते उघडतांना, किमान रकमेबद्दल कोणतीही जाणीव बँकांकडून ग्राहकांना दिली जात नाही आणि तसेच किमान शिल्लक न ठेवल्यास लावल्या जाणाऱ्या आकाराबद्दलही त्यांना काही सांगितले जात नाही. किमान शिल्लक रकमेत बदल केला गेल्यास त्याबद्दल ग्राहकांना कळविण्यात आल्याची खात्रीही बँकां करुन घेत नाहीत.

३. आम्ही या बाबत पुनरावलोकन केले असून, असे कळवीत आहोत की, यापुढे बँकांनी, ग्राहक खाते उघडत असतानाच, त्यांना पारदर्शकतेने खात्यात ठेवावयाच्या किमान शिल्लक रकमेबद्दल माहिती द्यावी. या बाबत झालेला कोणताही फरक / बदल खातेदारांना कळविण्यात यावा. ग्राहकांना ही माहिती कशा रीतीने द्यावी हे बँकांनीच ठरवावे.

४. कृपया पोच द्यावी

**आपला विश्वासू ,**
**(आर सी अग्रवाल )**
**महाव्यवस्थापक**